सं.फौ.प्र.क्र.६३१/२०२१
सरकार/ लक्ष्मण
निशाणी – १३ खाली

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की –
माझे नाव: प्रभाकर विठोबाजी पाकमोडे,
वयः ६० वर्षे, व्यवसायः खाजगी नौकरी,
निवासस्थान: नेरी, ता.चिमूर, जि. चंद्रपुर.

**<u>शपथेवर सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. पी. व्ही. गंधारे यांच्यामार्फत</u>**

मी आरोपीला ओळखतो. तो माझ्या घराशेजारी राहतो. घटना दिनांक १२.१०.२०२१ रोजी माझ्या घराजवळ दुपारी ०४.०० वाजताच्या सुमारास घडली होती. त्यावेळी माझी व आरोपीची बाचाबाची झाली. त्याव्यतीरीक्त आणखी काहीही घडले नव्हते. म्हणून मी रागाच्या भरात पोलीस तक्रार केली होती. आता मला अभिलेखावरील तोंडी तक्रार दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहीती नाही. म्हणुन त्यास **नि.क्र.१५** देण्यात आले.

**(साक्षीदार हा सरकारपक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे विद्वान सहायक सरकारी वकिलांनी उलटतपासनीच्या अनुशंघाने प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी मंजुर.)**

०२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १२.१०.२०२१ रोजी आरोपीने मला अश्लील भाषेत शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिली होती. आता मला माझ्या तक्रारीमधील अधोरेखांकीत भाग ‘अ’ दाखविण्यात आला. तो मी पोलीसांना सांगीतला नव्हता. तो पोलीसांनी माझ्या तक्रारीमध्ये का नमुद केला आहे याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीसोबत माझी न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आरोपीला वाचविण्यासाठी मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**<u>आरोपीतर्फे उलटतपास श्री. आर. जी. रामटेके वकील यांच्यामार्फत</u>**

०२. नाकारला.

श्रवणोत्तर स्विकृत
माझ्या समक्ष

ठिकाण – चिमूर
दिनांक – २१/०२/२०२६

(आर.डी. भुयारकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिमूर